

# योग्य कापूस वाणांची निवड महत्त्वाची...

डॉ. भाऊसाहेब पवार, डॉ. पवन कुलवाल

गेल्या काही वर्षांत हवामानातील वाढती अनिश्चितता, गुलाबी बोंड अळीचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि बदलते बाजारभाव या पार्श्वभूमीवर कापसाची वाण निवड अधिक महत्त्वाची आहे. योग्य वाणाची निवड केल्यास उत्पादन क्षमता वाढते, उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि हवामानाशी संबंधित जोखीम कमी करणे शक्य होते.

कापसाचे उत्पादन हे जमिनीचा प्रकार, हवामान, पावसाचे प्रमाण, सिंचन सुविधा, खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण, तण व्यवस्थापन आणि लागवड पद्धती यांसारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. मात्र या सर्व घटकांमध्ये योग्य वाणाची निवड हा उत्पादनाचा पाया मानला जातो. गेल्या काही वर्षांत हवामानातील वाढती अनिश्चितता, गुलाबी बोंड अळीचा वाढता प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि बदलते बाजारभाव या पार्श्वभूमीवर वाण निवड अधिक महत्त्वाची बनली आहे. योग्य वाणाची निवड केल्यास उत्पादन क्षमता वाढविणे, उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि हवामानाशी संबंधित जोखीम कमी करणे शक्य होते. आज बाजारात कापसाचे अनेक बी.टी. संकरित वाण उपलब्ध आहेत. मात्र जाहिरात पाहून निर्णय घेण्यापेक्षा स्थानिक परिस्थिती, जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन वाण निवडणे आवश्यक आहे.

## बदलत्या हवामानामध्ये वाण निवडीचे महत्त्व

**'एल निनो'मुळे भारतातील मॉन्सूनवर परिणाम होऊन पावसाचे प्रमाण कमी होणे किंवा पावसामध्ये मोठे खंड पडण्याची शक्यता वाढते. कापसामध्ये सुरुवातीला वाढीच्या अवस्थेत तसेच फुलोरा व बोंड धारणेच्या काळात ओलाव्याचा ताण आल्यास उत्पादनात मोठी घट येऊ शकते. अशा परिस्थितीत खालील बाबींचा विचार करावा.**

- कमी ते मध्यम कालावधीत परिपक्व होणारे वाण निवडावेत.
- ओलाव्याचा ताण तुलनेने सहन करणाऱ्या वाणांना प्राधान्य द्यावे. उपलब्ध पावसाचा कार्यक्षम वापर करणारे वाण निवडावेत.
- कोरडवाहू क्षेत्रात उशिरा परिपक्व होणारे वाण टाळावेत.
- सघन लागवड पद्धतीसाठी आटोपशीर वाढ असलेल्या वाणांचा विचार करावा.
- कमी कालावधीचे वाण निवडल्यास बोंडे लवकर परिपक्व होतात. नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव जास्त असतो, तो प्रादुर्भाव वाढण्यापूर्वी कापसाची लवकर वेचणी होते. लवकर वेचणी केल्याने नुकसान टळते. वेळेत पेरणी आणि योग्य कालावधीच्या वाणांचा वापर केल्यास प्रादुर्भावाची तीव्रता कमी करता येते.

## कापूस वाण निवडताना

- आपल्या भागात सातत्याने चांगले उत्पादन देणारा वाण निवडावा.
- गुलाबी बोंड अळी, रसशोषक किडी व प्रमुख रोगांना तुलनेने सहनशील वाणास प्राधान्य द्यावे.
- बोंडे चांगली फुटणारा, वेचणीस सुलभ आणि धाग्याची प्रत उत्तम असणारा वाण निवडावा.
- जमिनीचा प्रकार, ओलावा टिकवून ठेवण्याची क्षमता आणि उपलब्ध सिंचन यांचा विचार करावा.
- लागवड पद्धतीनुसार (सर्वसाधारण किंवा सघन लागवड) वाण निवडावा.
- कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांना शक्यतो प्राधान्य द्यावे.

## भारी व खोल जमीन, बागायती क्षेत्रासाठी वाण

भारी व खोल जमिनीत ओलावा अधिक काळ टिकून राहतो. त्यानुसार योग्य वाण निवडावेत.

- १६० ते १८० दिवसांचा कालावधी असलेले मध्यम परिपक्वतेचे वाण निवडावेत.
- अधिक उत्पादन क्षमता असलेले मध्यम ते मोठ्या बोंडांचे वाण निवडावेत.
- संतुलित वाढ आणि चांगली बोंडधारणा करणारे वाण निवडावेत.
- उशिरा परिपक्व होणाऱ्या वाणांमध्ये गुलाबी बोंड अळीचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नियमित निरीक्षण आवश्यक आहे.

## सघन लागवडीसाठी वाण

- योग्य वाण निवडल्याशिवाय सघन लागवडीचे अपेक्षित लाभ मिळू शकत नाहीत.
- संकरित वाणांना वाढ अधिक असल्याने कमी अंतरावर लागवड केल्यास झाडांमध्ये दाटी होऊन त्यांचे दुष्परिणाम होण्याची भीती असते. त्यामुळे सघन लागवडीमध्ये आटोपशीर ठेवण असलेला वाणांचे वाढ व्यवस्थापन करणे तुलनेने सोपे आहे. आटोपशीर ठेवण असल्यामुळे कपाशीच्या झाडामध्ये सूर्यप्रकाशाचा प्रवेश सुलभ होईल व झाडांची वाढ व्यवस्थित होईल.



## हलकी व मध्यम जमीन, कोरडवाहू क्षेत्रासाठी वाण निवड

हलक्या व मध्यम जमिनींमध्ये पाणी साठवून ठेवण्याची क्षमता कमी असल्याने पिकांवर ओलाव्याचा ताण लवकर येतो. अशा परिस्थितीत योग्य वाण निवडावा.

- १४० ते १५० दिवसांत परिपक्व होणारे कमी कालावधीचे वाण निवडावेत.
- कमी पाण्यात समाधान कारक उत्पादन देणाऱ्या वाणांना प्राधान्य द्यावे.
- लवकर बोंड धारणा करणारे वाण निवडल्यास पावसाच्या उपलब्ध कालावधीचा अधिक चांगला उपयोग होतो.
- कमी कालावधीचे वाण गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावापासून तुलनेने सुरक्षित राहतात.
- लवकर उत्पादन मिळाल्यामुळे बाजारातील सुरुवातीच्या दराचा फायदा मिळू शकतो.

## बियाणे खरेदी करताना

- बियाणे नेहमी परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावे.
- खरेदीचे पक्के बिल घ्यावे आणि जतन करून ठेवावे.
- बियाण्याचे पॅकिट, टॅग आणि बॅच क्रमांक सुरक्षित ठेवावेत.
- एखादा विशिष्ट वाण उपलब्ध नसल्यास त्याच प्रकारातील योग्य पर्याय निवडावा.
- अवास्तव उत्पादनाचे दावे करणाऱ्या जाहिरातींपासून सावध राहावे.

## बोगस व अनधिकृत बियाण्यांपासून सावध

काही ठिकाणी एचटीबीटी, बीजी-III, बीजी-IV अशा नावांनी बियाण्यांची विक्री केली जात असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांनी अशा बियाण्यांच्या आमिषाला बळी पडू नये. अनधिकृत बियाण्यांमध्ये उगवण क्षमता, उत्पादन क्षमता किंवा कीड प्रतिकारक्षमतेची कोणतीही हमी नसते. तसेच अशा बियाण्यांच्या वापरामुळे कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अधिकृत आणि मान्यताप्राप्त बियाण्यांचाच वापर करावा.

- डॉ. भाऊसाहेब पवार ७५८८६०४०९०
(कापूस सुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहिल्यानगर)